# प्रेस नोट

जा.क्र. ५७०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–१५/०९/२०१६.

## पत्रकार पोलीस संवाद या चर्चेदरम्यान पत्रकारांनी केलेल्या तक्रारीची पोलीस अधीक्षक विनीता साहू यांनी तात्काळ दखल घेवुन कार्यवाही केली.

दिनांक १४/०९/२०१६ रोजी पोलीस अधीक्षक भंडारा यांचे दालनात "पत्रकार संवाद" या विषयावर बैठक आयोजीत करण्यात आली होती बैठकीदरम्यान मा. विनीता साहू, पोलीस अधीक्षक भंडारा आणि जिल्हयातील पत्रकारांमधे संवाद साधण्यात आला त्यात विनीता साहू पोलीस अधीक्षक, भंडारा यांनी सद्या महाराष्ट्रात पोलीसांवर होत असलेल्या हल्ल्यांवर चिंता व्यक्त करुन भंडारा जिल्हयातील तुमसर खापा येथील पोलीसांवर झालेल्या हल्ल्याचा उल्लेख करुन त्यात १४ पोलीस अधिकारी/कर्मचारी जख्मी व १ पोलीस कर्मचारी गंभीर झाल्याची माहीती दिली त्यावेळी पत्रकारांनी समस्या मांडल्या त्यांचे निराकरण करण्यात आले यामधे प्रामुख्याने पोलीसांकडुन प्रेस नोट प्राप्त होत नाही हि समस्या होती त्याचे वेळीच निराकरण करण्यात येवुन संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांना प्रेस नोट वेळेवर देण्याचे आदेश दिले व यामधे आता आमुलाग्र बदल होईल असे कळविले

पत्रकारांनी मोरेश्वर मेश्राम याचे विरुध्द दाखल गुन्हयाची प्रगती विचारली असता त्यांना गुन्हयासंबंधाने योग्य ती माहीती देण्यात आली. तसेच श्री. खंडेरा यांना नवरात्री दरम्यान शितला माता मंदीरासमोर पार्कींगची व्यवस्था नसल्याने पार्कींग व्यवस्था करण्याबाबत सुचविले असता मा. पोलीस अधीक्षक यांनी नवरात्र पुर्वी पार्कींग बाबत बैठक बोलावुन उपाययोजना करण्यात येईल असे कळविले. टाईम्स ऑफ इंडीयाचे श्री. गोपु पिंपळापुरे यांनी अनेक मुद्दयांवर चर्चा केली त्यात प्रामुख्याने भंडारा शहरात अवैद्य सावकारी व्यवसाय मोठया प्रमाणात फोफावत असल्याने त्यावर प्रतिबंध घालुन कार्यवाही करणे आवश्यक आहे असे सांगीतले त्यावर पोलीस अधीक्षक यांनी कार्यवाही करण्याचे आश्वासन देवुन संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांना त्याच वेळी निर्देश दिले.

गणेशोत्सवादरम्यान जनतेने सहकार्य करावे विसर्जन दरम्यान कोणतेही अनुचित प्रकार घडु नये आणि आम्ही दिलेल्या निर्देशाचे पालन करावे असे आवाहन केले पत्रकारांनी भंडारा शहरातील जोगी तलाव येथे मोठया प्रमाणात अवैद्य दारु काढुन विक्री केली जाते अशी तक्रार केल्याने वेळीच पोलीस अधीक्षक यांनी बैठकीत हजर असलेले वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत कोलवाडकर यांना कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिल्याने श्री. कोलवाडकर यांनी त्यांचे पथकासह जोगी तलाव येथे धाड घालुन नामे १) संजय बकाराम मुल २) नरेंद्र परसराम नगरारे ३) राजेश शेखर मेश्राम ४) सुशील बकाराम मुल

५) लखन शिवनाथ मेंढे ६) सौ. बेबीनंदा सुभेलाल मेंढे सर्व रा. जोगीतलाव वार्ड भंडारा यांचे विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमान्वये पोलीस स्टेशन भंडारा येथे ६ गुन्हयांची नोंद केली-